Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

September - 2024

ISSUE No - (CDLXXXVIII) 488



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

20	Study of the impact of working mother's role conflict on the separatist attitude of adolescent boys and girls **Dr. Sarita R. Vishwakarma**	83
21	Environmental Degradation in Amitav Ghosh's The Great Derangement: Climate change and the Unthinkable and Barbara Kingsolver's Unsheltered: A Study- **Dr.Vitthal A. Ugemuge, Ashutosh S. Itankar**	90
22	Role of Government and NGO in the Economic Development of Tribal Area **Mr. Vikas Kashinath Deshmukh**	92
23	Information Technology and its Impact on HRM **Mr. Vaibhav S. Waghmare**	95
24	Recent Trends in Indian Banking **Dr. S. B. Donge**	99
25	भारतातील ऊर्जा संकट प्रा.पल्लवी काशिनाथ पावरा	102
26	भारतीय राज्यघटनेतील सामाजिक न्याय आणि समता डॉ. विकास चांदजकर	106
27	अर्थशास्त्रातील तंत्रज्ञानाचा प्रसार, व्यापार आणि परस्परावलंबन प्रा.डॉ.देविदास विक्रम हारगिले	110
28	लिंग समानता आणि भारतीय संविधान डॉ.एस.जी.चर्जन	116
29	भारतीय संस्कृती में संगीत का स्थान प्रा.डॉ.सचिन सुरेशराव बंडगर	120
30	आदिवासींची ओळख : तारफा नृत्य प्रा. विद्या प्र. गावंडे	122
31	भोई समाजातील डहाका वाद्याविष्कार – एक अभ्यास डॉ. राजीव बोरकर, श्वेता रामभाऊ बोरवार	124
32	लैगिंक समानता आणि भारतीय संविधान डॉ. मनोज कृष्णराव सरोदे	127
33	भारतीय संस्कृतीचे जागतिक आकर्षण डॉ.सतिश हरलाल पारधी	132
34	पंचायत समितीमध्ये महिलांच्या राजकीय भूमिकेचे अध्ययन सुरेंद्र श्रीराम पांडे, प्रा. डॉ. रजनिश गो.बांबोळे	135
35	नाथजोगी समाजाचे लोकसंगीत—भारुड डॉ. अर्चना सं. देशपांडे चिराग रामभाऊ बोरवार	138
36	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील महिलोन्नती प्रांजली ह. पेंदामकर, डॉ. शोभा रोकडे	141
37	भारतीय समाजाच्या प्रगतीत मराठी संतांचे योगदान नवाजी गेंदलाल घरत	144
38	शाश्वत सामाजिक विकास आणि लिंग समानता डॉ. सुजाता नाईक	148
39	सर्वेश्वरदयाल सक्सेना के साहित्य में अभिव्यक्त सौन्दर्य-दृष्टि डॉ. तीर्थराज राय , जया रमेशलाल बजाज	152

'B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO. (CDLXXXVIII..) 488
ISSN : 2278-9308 September 2024

भारतीय राज्यघटनेतील सामाजिक न्याय आणि समता

डॉ. विकास चांदजकर
मातोश्री शांताबाई गोठे महाविद्यालय, वाशिम
vikaschandajkar@gmail.com 9764294888

सारांश

सामाजिक न्याय आणि सामाजिक समता ह्या एकसारख्या असलेल्या संकल्पना आहेत. सामाजिक न्याय हे कल्याणकारी राज्याचे एक वैशिष्ट्य आहे. भारतात सामाजिक न्याय प्रस्तापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संपत्तिवाटप, संधी, वंश, जात, धर्म, उच्च-नीच फरक, इत्यादी विषयांतील विषमतेचे निर्मूलन करून कुठलाही भेदभाव नसलेल्या वर्गरहित समाजाकडे वाटचाल करणे सामाजिक समतेत अभिप्रेत आहे. असाहाय्य व दारिद्र्यास खितपत पडलेल्यांची उन्नती करण्यासाठी प्रगत करणे हेच सामाजिक समतेचे उद्दिष्ट आहे. भारताच्या राज्यघटनेत मानवी प्रतिष्ठेविषयी सन्मान, समतेच्या तत्त्वांशी बांधिलकी आणि दुर्बल घटकांविषयी कळकळ या तीन गोष्टी प्रखरतेने प्रतिबिंबित होतात. समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, आर्थिक, राजकीय, सामाजिक हक्क, स्त्री–पुरुष समानता, समाजातील सर्व व्यक्तींना शिक्षणाची, विकासाची संधी आदी मूल्ये आणि तत्त्वे ही सामाजिक न्यायाची उद्दिष्टे आहेत.

प्रस्तावना

सामाजिक न्याय म्हणजे शोषणविरहीत, समताधिष्ठित, न्याय्य समाजाची निर्मिती होय.आयुष्याला आकार देणाऱ्या मूलभूत सोई-सुविधा सर्वांसाठी उपलब्ध असायला हव्यात. सामान्यपणे देशांतर्गत व देशादेशांमधील उत्पन्नाच्या वाटपातील प्रचंड असमानतेला समानतावादी कायमचेच विरोध करत आले आहेत. यासाठी संपत्ती व उत्पन्नाच्या पुनर्वाटपाला पर्याय नाही, असे त्यांना वाटते. योग्य रीतीच्या आर्थिक समतेत सर्वांना समान संधी, श्रमाला योग्य मोबदला, कामाच्या ठरावीक वेळा, इ. गोष्टी अंतर्भूत असाव्यात. आर्थिक समतेव्यतिरिक्त इतर कुठल्याही समतेचे प्रकार केवळ औपचारिक व अवास्तव आहे.

जेव्हा पुरोगामी कार्यक्रमांमधून सामाजिक फायदे तळागाळातल्यापर्यंत पोचतील तेव्हाच खऱ्या अर्थाने सामाजिक-आर्थिक समता स्थापित होईल. सैद्धान्तिकतेतून वास्तवातील समानतेकडे, नकारात्मतेकडून सकारात्मक समानतेकडे व स्थितिशीलतेतून गतिमान समानतेकडे आपली वाटचाल होत राहील, असा विश्वास समानतावाद्यांना वाटतो. एक समाजवादी राष्ट्र या भूमिकेतून सामाजिक न्याय ही संकल्पना समताधिष्ठित समाजनिर्मितीकडे जाणारी आहे. सामाजिक न्याय या विस्तृत संकल्पनेमध्ये पुढील उपघटकांचा समावेश होतो. त्यामध्ये दलितांचे प्रश्न - प्रतिनिधित्व, आरक्षण, ॲट्रॉसिटी, विषम वागणूक इत्यादी. आदिवासींचे प्रश्न - जंगल आणि जमिनीवरचा हक्क, समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याविषयीच्या समस्या, स्त्रियांचे प्रश्न तसेच अपंगांच्या समस्या, वृद्धांच्या समस्या, मानवी देह व्यापार, बालकामगार, झोपडपट्ट्यांचे प्रश्न, शिक्षणाच्या समस्या विशेषतः ग्रामीण भागातील शिक्षण तसेच आरोग्य, कुपोषणाची समस्या या सर्व बाबींचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

उदय आणि विकास

ऐतिहासिक दृष्ट्या सामाजिक न्याय ही संज्ञा अगदी अर्वाचिन आहे. ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो यांनी त्यांच्या द रिपब्लिक या पुस्तकात न्यायाचा अर्थ मानवी खुशहालीपर्यंत विस्तारित केला असला, तरी त्यात समतेच्या भावनेला थारा नव्हता. माणसाला त्याच्या सामाजिक पायरीप्रमाणे देय गोष्टी दिल्या की, न्याय होतो अशी त्यांची धारणा होती. अर्थातच प्लेटोप्रणीत सामाजिक न्यायात विषमतेवर आधारित सामाजिक संरचनेला बदलण्याऐवजी तिच्या प्रचलित संस्थांना जोपासनेच अनुस्यूत होते.पुढील दोन शतकांत भांडवलशाहीच्या विकास प्रक्रियेतून सामाजिक न्यायाचे आदर्श आणि वास्तव यातील दरी रुंदावत गेली. सामाजिक न्यायाची अमूर्त कल्पना व सामाजिक अन्यायाचे वास्तव यांतील तफावतीने पुढच्या काळातील चळवळींना आणि क्रांत्यांना जन्म दिला. यात कार्ल मार्क्स यांच्या

साम्यवादी तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे योगदान आहे. मार्क्स यांनी थॉमस हॉब्स यांचा माणसाविषयीचा नकारार्थी दृष्टीकोन अमान्य केला. अन्याय हा माणसातील नैसर्गिक स्पर्धा, स्वार्थ व आक्रमकता यांचे सहउत्पादन असते, या हाब्सप्रणित कल्पनेच्या जागी मार्क्स यांनी अन्यायाची मुळे ही भेदभाव, दमन, शोषण, विशेषाधिकार इत्यादी घटकांवर आधारित असलेल्या समाजाच्या राजकीय, आर्थिक संरचनेतच दडलेली असतात हे दाखवून दिले. मार्क्स यांनी प्रथमच नि:संदिग्धपणे माणसाला त्याच्या सामाजिक दर्जाच्या आधारावर नाही, तर एक माणूस म्हणून आवश्यक असणाऱ्या गोष्टी मिळण्यामध्ये सामाजिक न्याय असतो, हे सांगितले. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जॉन रोल्स यांनी त्यांच्या थिअरी ऑफ जस्टीस या पुस्तकात सामाजिक न्यायाची संकल्पना मांडली आहे. त्यांच्या मते, 'समाजाची मूलभूत संरचना हीच सत्ता व स्वातंत्र; अधिकार व संधी; मिळकत व संपत्ती इत्यादींशी संबंधित यावर बेतलेल्या सामाजिक न्यायावर आधारित असली पाहिजे. माणसाच्या प्राथमिक गरजांची पूर्ती व्हायलाच पाहिजे म्हणजे सामाजिक न्याय'. रॉल्स यांनी न्याय हा सरकारच्या कायदा करणाऱ्या शक्तीमधून नव्हे, तर जनतेच्या संमतीतून प्रकट झाला पाहिजे, या तत्त्वावर भर दिला आहे.

सामाजिक न्यायाची व्याप्ती :

1. कोणत्याही प्रकारच्या ऐतिहासिक विषमतेला जोपर्यंत ती विद्यमान अन्यायास खतपाणी पुरविते, तोपर्यंत तिला सक्रिय विरोध आणि तिच्या निर्मूलनासाठी प्रयत्न करणे.
2. व्यक्ती आणि समाज या गटांमध्ये संपत्ती, सत्ता, दर्जा, इभ्रत इत्यादींचे समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने त्यांच्या परस्पर मागासलेपणाच्या प्रमाणात पुनर्वाटप करणे.
3. सर्व नागरिकांना मूलभूत, पण कालसापेक्ष अशा जीवनयापनाच्या पातळीची आणि त्यांच्या सर्वांगिण विकासाची हमी देणे.
4. सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टांसाठी लोकाभिमुख प्रशासकीय धोरणांचे प्रयोजन करणे व ते राबविणे.
5. या धोरणांना विरोध करणाऱ्या प्रतिगामी शक्तींना प्रतिरोध करणे व त्यांचे नियंत्रण करणे इत्यादी गोष्टींची प्राथमिक जबाबदारी एक प्रातिनिधिक संस्था म्हणून राज्यसरकारची असते.

सामाजिक न्याय आणि समता

भारतात ऐतिहासिक काळापासून जात, धर्म, वंश, भाषा इत्यादींवरून होणाऱ्या भेदभावामुळे सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणावर होती. ती विषमता नष्ट करणे, आणि विषमतेमुळे मागे पडलेल्या घटकांना काही सवलती देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करणे, यास सामाजिक न्याय प्रस्थापित करणे असे म्हणता येईल.न्याय' ही एक बहुआयामी संकल्पना आहे. मानवी समाजातील लोकांचे परस्पर संबंध हे हितकारक आणि प्रगतीला पूरक असावेत यासाठी लोकशाही राज्यव्यवस्थेत लोकांचे स्वातंत्र्य, त्यांचे हक्क, कर्तव्ये, जबाबदाऱ्या इत्यादींचे निकष ठरवले जातात. मग त्या निकषांवर आधारित नीतीनियम व कायदे राज्यसंस्थेने लागू करावेत, त्या कायद्यांचे पालन लोकांनी करणे हे बंधनकारक करावे, कायदे न पाळणे हा गुन्हा मानावा, आणि गुन्ह्यासाठी त्याच्या स्वरूपानुसार शिक्षा देण्याची तरतूद असावी, अशी न्याय या संकल्पनेची ढोबळ चौकट असते. स्वातंत्र्य, समता, आणि परस्पर बंधुत्व ही न्यायाची अविभाज्य अंगे होत. समाजातील प्रत्येकाला समान स्वातंत्र्य व समान संधी उपलब्ध करून देणे, आणि योग्य संधीच्या अभावी वर्षानुवर्षे आर्थिक-सामाजिक उपेक्षेच्या संकटात सांपडलेल्यांना झुकते माप देऊन त्यांना इतरेजनांच्या पातळीवर आणणे, हेही न्यायाचेच एक द्योतक होय. पाश्चिमात्य जगात ख्रिस्तपूर्व काळात ग्रीक तत्ववेत्ते प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी, आणि नंतरच्या काळात जॉन रॉल्स आणि कार्ल मार्क्स यांनी न्यायाच्या संकल्पनेबाबत आपापले सिद्धान्त मांडलेले आहेत. ख्रिस्तपूर्व ५ व्या शतकातल्या प्लेटोचे म्हणणे असे होते की समाजातील प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या अंगभूत नैसर्गिक गुणांच्या आधारावर काही विविक्षित कामे करू शकते. प्लेटोच्या मते समाजात नवनिर्मितीची प्रवळ इच्छा असणारा एक उत्पादक-वर्ग, अंगी साहस किंवा शौर्य असणारा एक लढाऊ-वर्ग, आणि बुद्धी व विवेक असणारा शासक-वर्ग, या तीन वर्गांचे लोक असतात. या साऱ्यांनी एकमेकांच्या सहकार्याने, एकमेकांच्या कामांत हस्तक्षेप न करता आपापली कामे निष्ठेने करणे हेच न्यायाचे द्योतक होय. विसाव्या शतकाच्या मध्यावर जॉन

रॉल्स या अमेरिकन विचारवंताने असे म्हटलेले आहे की सर्वांना समान स्वातंत्र्य देणे, आणि समाजातील विषमतेचे योग्य नियोजन करणे, या दोन गोष्टी न्यायासाठी आवश्यक असतात. सर्वांना केवळ समान संधी देऊन न्याय प्रस्थापित होईलच असे नाही. समान संधी मिळूनही एखादा वर्ग उपेक्षित राहात असेल तर त्याला थोडे झुकते माप देणे हे न्यायाचे ठरेल. भारतात मागासवर्गीयांना दिलेले आरक्षण हे याचे उत्तम उदाहरण होय. कार्ल मार्क्स याने मांडलेली न्यायाची कल्पना समाजातील आर्थिक व्यवस्थांशी जुडलेली आहे. औद्योगीकरणाच्या प्रक्रियेतून समाजात मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता निर्माण होत असते. भांडवलशाही व्यवस्थेकडून कष्टकरी कामगारांचे शोषण होत असते. अशा व्यवस्थेत श्रीमंतांसाठीचा न्याय हा गरिबांसाठी असणाऱ्या न्यायापेक्षा वेगळा असतो. ही असमानता दूर करून सर्वांसाठी एकच न्याय प्रस्थापित करणे, म्हणजे सामाजिक न्यायाची बूज राखणे होय, असे मार्क्सचे म्हणणे होते.भारतात ऐतिहासिक काळापासून जात, धर्म, वंश, भाषा इत्यादींवरून होणाऱ्या भेदभावामुळे सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणावर होती. ती विषमता नष्ट करणे, आणि विषमतेमुळे मागे पडलेल्या घटकांना काही सवलती देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करणे, यास सामाजिक न्याय प्रस्थापित करणे असे म्हणता येईल. समाजातील कोणत्याही जातीच्या, धर्माच्या, किंवा वर्गाच्या व्यक्तीसाठी अन्न-वस्त्र-निवारा या मूलभूत गोष्टी उपलब्ध करून देणे, त्यास विकासाची योग्य संधी देणे, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या सबल असलेल्यांकडून दुर्बलांचे होणारे शोषण थांबवणे, आणि आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करणे, ही सूत्रे सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत महत्वाची आहेत. उपेक्षितांना समान संधी देण्यासोबतच सुरक्षा प्रदान करणे हेही गरजेचे असते. तणाव आणि भय यांपासून दुर्बलांना मुक्तता मिळवून देणे हे मुख्यत: राज्यसंस्थेचे काम असते. राज्यातील विविध सामाजिक आणि आर्थिक स्तरांच्या मूलभूत गरजा भागवणे, त्यांना समान संधी देणे, त्यांच्यात उद्भवणारे संघर्ष कमी वा नष्ट करणे, आणि समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे ही सामाजिक न्यायाची मुख्य उद्दिष्ट्ये होत. भारताच्या संविधानात समाविष्ट असलेली सामाजिक न्यायाची संकल्पना देखील समाजातील असंतुलन नष्ट करून कल्याणकारी राज्यास प्राधान्य देणारी आहे.

1. ज्या ज्या सामाजिक बाबींमुळे व्यक्तीवर अन्याय होतो, तो दूर करून व्यक्ती म्हणून सर्वांचा समान आहे याचा आग्रह धरणे म्हणजेच सामाजिक न्याय प्रस्थापित करणे होय.
2. जात, धर्म, भाषा, लिंग, जन्मस्थान, वंश, संपत्ती इत्यादींच्या आधारे श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेद न करणे, विकासाची समान संधी उप्लब्ध करून देणे हे न्याय व समतेमागील उद्दिष्ट आहे.
3. संविधानाने सामाजिक न्याय व समता या मूल्यांवर आधारित एक नवा समाज निर्माण करण्याचा मार्ग स्पष्ट केला आहे.
4. यासाठी सर्व समाजघटकांना सामावून घेण्याबाबत काही प्रयत्न केले जातात. उदा. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यावरील अत्याचारांपासून संरक्षण देणारा कायदा, वंचित घटकांकरता शिक्षण व रोजगारामध्ये राखीव जागांची तरतूद, अल्पसंख्याकांना समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क यांबाबत तरतूद, तसेच स्त्रियांसाठीचे विविध कायदे इत्यादी.

न्याय ही मानवी संकल्पना असल्यामुळे ती गतिमान आहे. न्यायाची कल्पना भिन्नभिन्न समाजांत वेगवेगळी असते. तसेच कालानुसार तिच्यात फेरबदल होतात. काल न्याय्य वाटणारी गोष्ट विद्यमान परिस्थितीत अन्याय्य वाटू शकते. कधीकधी याउलटही स्थिती असते. उदा., पूर्वी पाश्चात्त्य देशांत पुरुषांनाच फक्त मताधिकार होता. तो १९२८ पर्यंत योग्य व न्याय्य मानला जाई. आता स्त्री–पुरुष समानतेची कल्पना सर्वत्र समाजमान्य झाल्यामुळे स्त्रीला मतदानाचा हक्क नाकारणे अन्यायाचे होईल; तथापि काही समाजांत अद्यापि स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन उपभोग्य वस्तू असा असून तिथे स्त्रियांची खरेदी–विक्री होते किंवा सार्वजनिक जीवनात त्यांना स्थान नाही. येथील समाजाला त्यात काही अन्यायकारक वाटत नाही आणि महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांनाही आपल्यावर अन्याय होतो, असे वाटत नाही. त्यामुळे न्याय–अन्याय ठरविणे कठीण होते. या गतिमान संकल्पनेला तत्कालीन समाजाची मान्यता आवश्यक असून समाजमान्य मूल्यांवर न्यायाची संकल्पना अधिष्ठित असते, हा निष्कर्ष यातून काढता येईल. म्हणून न्याय म्हणजे काय आणि अन्याय म्हणजे काय, याची जाणीव समाजाला होणे महत्त्वाचे आहे. समाजात जेव्हा अन्यायाची जाणीव होते, तेव्हा त्याचे परिमार्जन करण्याकरिता प्रतिकारार्थ चळवळी निर्माण होतात. सती, बालविवाह, अस्पृश्यता, हुंडा, तलाक

या दुष्ट रुढींविरुद्ध समाजाला दीर्घकाळ संघर्ष करावा लागला, तरी सुद्धा अद्यापि या सर्व रुढींचे समूळ उच्चटन झाले आहे, असे ठामपणे सांगता येत नाही.

भारतीय राज्यघटना आणि सामाजिक न्याय : भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्याचा उल्लेख आहे. सोवत विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासनाचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता, बंधुता, तसेच राजकीय, आर्थिक व सामाजिक न्यायाचा स्पष्ट उल्लेख आहे. ही मूल्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फ्रेंच क्रांतीतून नाही, तर गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानातून घेतले आहेत.

भारताच्या राज्यघटनेत मानवी प्रतिष्ठेविषयी सन्मान, समतेच्या तत्त्वांशी बांधिलकी आणि दुर्बल घटकांविषयी कळकळ या तीन गोष्टी प्रखरतेने प्रतिबिंबित होतात. या तीनहीवद्दलचे विवेचन राज्यघटनेच्या 'भाग 2 – मूलभूत अधिकार' आणि 'भाग ४ – राज्य धोरणाची निर्देशक तत्त्वे' या दोन भागांतून दिसतात. भारतीय राज्यघटना समतेच्या तत्त्वाने सर्वत्र भारलेली आहे. स्त्रिया, मुले, मागास जाती, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अन्य दुर्बल घटक यांच्यासह कोणत्याही व्यक्तिशी कोणत्याही कारणाने भेदभाव केला जाणार नाही, सर्वांना सम सामाजिक न्याय मिळेल हे भारतीय राज्यघटनेत नमूद केले आहे. घटनेच्या 15 (3) कलमानुसार स्त्रिया आणि मुलांच्या कल्याणासाठी व उत्थानासाठी विशेष प्रावधाने करण्याचा निर्देश आहे. कलम 15 (4) कलमानुसार कोणत्याही सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या मागास असलेल्या वर्गासाठी आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या उत्थानासाठी अशीच विशेष प्रावधाने करण्याची मुभा आहे. 16 (4) कलमानुसार ज्या जातींचे सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्त्व नाही, त्या मागास जातींसाठी नोकऱ्यांत आरक्षणाचे प्रावधान करण्याची मुभा आहे. भारतीय राज्यघटनेतील 46 वे कलम राज्याला जनतेच्या दुर्बल घटकांची, विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या शैक्षणिक आणि आर्थिक बाबींची विशेष काळजी घेण्याचे, त्याच प्रमाणे त्यांना सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण देण्याचे निर्देश देते.

निष्कर्ष

सामाजिक न्यायाची संकल्पना मानवा-मानवांमधील सामाजिक स्थितीच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करणे, प्रत्येक व्यक्तिला आपल्या क्षमतेनुसार विकासाच्या समान संधी उपलब्ध असणे, कोणत्याही व्यक्तिचे कोणत्याही प्रकारचे शोषण होऊ न देणे, समाजातील प्रत्येक व्यक्तिची किमान गरजा पूर्ण होतील अशी व्यवस्था निर्माण करणे, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊ न देणे आणि समाजातील दुर्बल वर्गालाही सुरक्षित वाटावे अशा वातावरणाची निर्मिती करण्याच्या संबंधित आहे.

संदर्भ :

1.डॉ जोशी बी. आर. राज्याशास्त्रकोश, डायमंड पब्लिकेशन पुणे जानेवारी,2007
2.चौधरी राजेश, भारताचे संविधान, चौधरी लॉ पब्लिशर, पुणे, पाचवी आवृती,2013
3.महाराष्ट्र टाइम्स, 21 June 2019
4.मराठी विश्वकोष, 23 Feb.2021
5.लोकसत्ता, 12 Oct. 2023
6.महाराष्ट्र टाइम्स, Date-18 Sept.2018
7. तरूण भारत , Date-25Nov.2022
8. तरूण भारत , Date-13 Aug.2022
9. समाज आणि मानवी हक्क, शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर ,2015
10. मानवाधिकार संरक्षण अधिनियम -1993,राष्ट्रीय मानवाधिकार आयोग 27 जुलै 2019